# पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता 5 वी), फेब्रुवारी 2026

**बैठक क्र.** | | | | | | | | | | | |

**0 1 0 1**

**पेपर क्र. - I**

**वेळ : 11:00 ते 12:30**

## माध्यम : मराठी

**संच A**

## प्रथम भाषा व गणित

**एकूण गुण : 150** **पृष्ठ : 32**

**प्रश्नपत्रिका सोडविण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

(1) या प्रश्नपत्रिकेत **दोन** विभाग आहेत. त्यापैकी विभाग **I** मध्ये प्रथम भाषा विषयासाठी **1** ते **25** व विभाग **II** मध्ये गणित विषयासाठी **26** ते **75** असे एकूण **75** प्रश्न आहेत. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) प्रत्येक प्रश्नासाठी **2** गुण आहेत.

(3) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एकूण **90** मिनिटांचा कालावधी दिला जाईल.

(4) उत्तरे नोंदविण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेली आहे. प्रत्येक प्रश्नक्रमांकासमोर चार पर्यायासाठी क्रमागत वर्तुळे दिलेली आहेत. त्यातील अचूक उत्तराचा पर्याय क्रमांक असलेले वर्तूळ पुढील उदाहरणात दाखविल्याप्रमाणे रंगवा. उदा. प्रश्न क्र. **6** च्या बरोबर उत्तराचा पर्याय क्र. **2** असेल, तर तो पुढीलप्रमाणे नोंदवावा.
प्रश्न क्र. **6** ① ● ③ ④

(5) खालीलप्रमाणे नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. असे उत्तर नोंदविल्यास त्या प्रश्नास 'शून्य' गुण दिले जातील. ✓ ② ⊙ ④

(6) प्रत्येक प्रश्नासाठी एकापेक्षा अधिक वर्तुळात नोंदविलेली उत्तरे, खाडाखोड करून नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(7) एकदा नोंदविलेली उत्तरे पुन्हा बदलता येणार नाहीत.

(8) पर्यायाची उत्तरे नोंदविताना फक्त काळ्या किंवा निळ्या रंगाच्या बॉलपेनचाच वापर करावा. पेन्सिलने नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(9) प्रश्नपत्रिकेत प्रत्येक पानावर खाली व शेवटच्या पानावर कच्चे काम करण्यासाठी मोकळी जागा आहे, तेथेच कच्चे काम करावे.

(10) परीक्षेस मर्यादित वेळ असल्याने एखाद्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला येत नसल्यास पुढील प्रश्न सोडवा. शेवटी वेळ शिल्लक राहिल्यास उरलेल्या प्रश्नांसाठी पुन्हा प्रयत्न करावा.

(11) एखाद्या प्रश्नात त्रुटी/चूक आढळल्यास त्याबाबत पर्यवेक्षक किंवा परीक्षा केंद्रसंचालक यांच्याकडे विचारणा करू नये.

(12) प्रश्नातील त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन शाळेने किंवा पालकांनी गटशिक्षणाधिकारी किंवा शिक्षणाधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात न पाठवता संबंधित शाळेच्या लॉगीन मधून ऑनलाईन पद्धतीनेच पाठवावे.

(13) त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन ऑनलाईन पद्धतीने पाठविण्याची मुदत परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची प्रसिद्ध झाल्यापासून 10 (दहा) दिवसांपर्यंत राहील.

(14) मुद्रणदोष किंवा अन्य कारणांमुळे प्रश्न चुकीचा असल्याचे आढळल्यास तज्ञ समितीच्या अभिप्रायानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल.

(15) मूळ माध्यमासोबत इंग्रजी भाषेतील प्रश्नपत्रिका दिलेली आहे. मूळ माध्यमातील संदिग्ध प्रश्नांबाबत इंग्रजी प्रश्न पहावेत.

**विभाग - I**

**मराठी**

**01.** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दासाठी अचूक मराठी पर्यायी शब्द निवडा :
'सुमेधला क्रिकेट मॅच पाहता आली नाही, म्हणून त्याने हायलाईट्स पाहायचे ठरविले.'

(1) क्षणचित्रे  (2) पुनर्प्रक्षेपण
(3) रिपीट  (4) सामना

**02.** खालील अर्थाची म्हण पर्यायांतून निवडा :
'दोन्ही बाजूंनी बोलणाऱ्या व्यक्तीला काही किंमत नसते.'

(1) दोन्ही घरचा पाहुणा उपाशी.  (2) इकडे आड तिकडे विहीर.
(3) एकाच नाण्याच्या दोन बाजू.  (4) दुहेरी बोलाची कवडी मोलाची.

**03.** 'पाणी' या शब्दाला अचूक समानार्थी शब्द पर्यायांतून निवडा :

(1) वर्षाव  (2) तुषार
(3) अंबु  (4) मेदिनी

**04.** 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज' यांचे पूर्ण नाव काय?

(1) नारायण सूर्याजी ठोसर  (2) विनायक जनार्दन करंदीकर
(3) माणिक बंडोजी बह्मभट  (4) माणिक तात्या तळवलकर

**05.** प्राणी आणि त्यांची पिले यांच्या अचूक जोड्या लावलेला पर्याय निवडा :

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | म्हैस | 1) | पिलू |
| ब) | गाढव | 2) | शावक |
| क) | हत्ती | 3) | रेडकू |
| ड) | हरीण | 4) | शिंगरु |

(1) अ - 3, ब - 1, क - 4, ड - 2  (2) अ - 3, ब - 4, क - 1, ड - 2
(3) अ - 2, ब - 1, क - 4, ड - 3  (4) अ - 4, ब - 2, क - 1, ड - 3

**06.** सर्वात पहिला भारतरत्न पुरस्कार कोणाला मिळाला?

(1) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन  (2) महर्षी धोंडो केशव कर्वे
(3) आचार्य विनोबा भावे  (4) डॉ. पांडुरंग काणे

**कच्च्या कामासाठी फक्त**

**07.** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचा योग्य अर्थ पर्यायांतून निवडा.

'अब्जावधी फुलांमध्ये ते एक अब्ज खुलून दिसत होते.'

(1) एक संख्या
(2) शंभर कोटी
(3) श्रीमंत व्यक्ती
(4) कमळ

**08.** खालीलपैकी वर्णानुक्रमे योग्य शब्द असलेला पर्याय कोणता?

(1) कसर, कृत्रिम, कासरा, काळजी
(2) कासरा, काळजी, कृत्रिम, कसर
(3) कसर, कासरा, काळजी, कृत्रिम
(4) कृत्रिम, कसर, काळजी, कासरा

**09.** पुढीलपैकी जोडशब्द नसलेला पर्याय कोणता?

(1) दानधर्म
(2) फौजफाटा
(3) हेळसांड
(4) धनधान्य

**10.** अधोरेखित शब्दसमूहाबद्दल अचूक शब्द निवडा :

आयुष्यभर बचत करुन अखेरीस दत्तूने एक लहानसे, सुंदर व शोभिवंत असे घर बांधले.

(1) महागडे
(2) राजवाडा
(3) टुमदार
(4) ऐसपैस

**प्रश्न क्र. 11 ते 13 साठी सूचना :**

**खालील बातमी काळजीपूर्वक वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांतून निवडाः**

पुणे, ता. 21 : 'गिरीदर्शन' या संस्थेने आयोजित केलेल्या 'किल्ले पर्यटन' या उपक्रमांतर्गत साताऱ्यातील 'बालभवन' मधील 25 विद्यार्थी गुरुवारी दि. 18 रोजी पुण्यात आले होते.

उपक्रमाची सुरुवात सज्जनगडापासून झाली. जवळच असलेल्या 'अजिंक्यतारा' या किल्ल्याला भेट देऊन सर्वजण त्याच रात्री पुणे येथे मुक्कामी आले. पुढचे तीन दिवस त्यांनी तोरणा, राजगड, पुरंदर, सिंहगड अर्थात कोंढाणा या किल्ल्यांना भेटी दिल्या. पुण्यातील नामवंत उद्योगपती श्री. विकास नगरे यांनी सर्व विद्यार्थी, 10 स्वयंसेवक आणि बालभवनचे सर्वेसर्वा श्रीरंग पाटील या सर्वांचे यथोचित आदरातिथ्य केले. या संपूर्ण उपक्रमाचा भार 'बालभवन' या संस्थेने उचलला. उपक्रमाची सांगता सिंहगडावर काल संध्याकाळी पाच वाजता करुन ते सर्वजण तेथूनच साताऱ्याकडे रवाना झाले.

**11.** 'किल्ले पर्यटन' अंतर्गत किती किल्ल्यांना भेटी दिल्या?

(1) सात
(2) सहा
(3) पाच
(4) आठ

कच्च्या कामासाठी फक्त

12. वरील बातमीत उल्लेख झालेले श्री. विकास नगरे हे कोण होते?
(1) बालभवनाचे सर्वेसर्वा
(2) गिरीदर्शनचे प्रमुख
(3) नामवंत उद्योगपती
(4) स्वयंसेवक

13. 'किल्ले पर्यटन' उपक्रमाची सांगता कोणत्या दिवशी झाली असावी?
(1) गुरुवारी (2) शनिवारी
(3) सोमवारी (4) रविवारी

**प्रश्न क्र. 14 ते 16 साठी सूचना –**
**कविता वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांतून निवडा :**

किती मौज दिसे ही पहा तरी
हें विमान फिरते अधांतरी ।।धृ.।।
खोल नदीतुन कापित पाणी
मत्स्य धावतो चहुबाजूंनी,
घारच अथवा फिरते गगनी,
हुबेहुब हे त्याच परी ।।1।।
रविकररंजित मेघांमधुनी,
स्वच्छ चांदण्यामधे पोहुनी,
घुमघुम् नादे दिशा घुमवुनी,
प्रवास करि हे जगावरी ।।2।।
पहा जाऊनी विमानातुनी
दिसेल शोभा अपूर्व वरुनी,
डोंगर, राने, ओहळ, तटिनी
आणि कुठे सागरलहरी ।।3।।

14. विमानातून प्रवास करताना कोणती गोष्ट दिसणार नाही?
(1) डोंगर (2) समुद्राच्या लाटा
(3) वरुण (4) नदी

**कच्च्या कामासाठी फक्त**

**15.** पुढीलपैकी कोणते विधान कवितेतील वर्णनाशी जुळणारे नाही?

(1) विमान पांढऱ्याशुभ्र ढगांमधून प्रवास करते.

(2) विमान दिसताच दिशा घुमघुम आवाज करु लागतात.

(3) विमान खोल पाण्यात पोहणाऱ्या माशाप्रमाणे आभाळात चहूबाजूंना विहरते.

(4) विमान गगनात विहार करणाऱ्या घारीप्रमाणे फिरते.

**16.** पुढीलपैकी कोणत्या शब्दाचा समान अर्थाचा शब्द कवितेत आला आहे?

(1) माता (2) विहग

(3) अवनी (4) सौंदर्य

**17.** 'सोनालीने आपल्या परस बागेत सोनटक्का, जाई, मोगरा, पारिजात या फुल झाडांसोबत रंगीत कारंजेदेखील बसवले.'

वरील वाक्यातील नामांची संख्या दर्शवणारा योग्य पर्याय निवडा :

(1) 8 (2) 4

(3) 6 (4) 7

**18.** पुढीलपैकी अशुद्ध शब्दाचा पर्याय निवडा :

(1) अलगत (2) नियमित

(3) तीक्ष्ण (4) हाहा:कार

**19.** खाली दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दाचे लिंग पर्यायांतून ओळखा.

'बुलबुल पक्ष्याच्या सुरेल <u>ताना</u> मी शेवग्यामुळेच ऐकू शकले.'

(1) पुल्लिंग (2) स्त्रीलिंग

(3) नपुंसकलिंग (4) उभयलिंग

**20.** खाली दिलेल्या वाक्याचा काळ ओळखून त्याच काळाचे वाक्य असलेला पर्याय निवडा :

'राही पळत जाऊन गाडी पकडेल.'

(1) अभिज्ञाचे नृत्य कौशल्य पाहून लोक थक्क झाले.

(2) सायली रोज सकाळी गाण्याचा रियाज करते.

(3) गौतमच्या मनात खूप शंका होत्या.

(4) सोहम चहा घेणार आहे.

<u>**कच्च्या कामासाठी फक्त**</u>

**21.** खालील वाक्यात कोणते विरामचिन्ह द्यावयाचे राहिले आहे?
'रमाई या दीन दुबळ्यांची आई व बहुजनांची सावली होत्या.'
(1) उद्गारचिन्ह (2) अर्धविराम (3) संयोगाचिन्ह (4) स्वल्पविराम

**22.** खालील वाक्यात रिकाम्या जागी कोणता वाक्प्रचार निवडला असता वाक्य अर्थपूर्ण होईल?
'गावात पोलीस आले ही बातमी ...............गत सगळीकडे पसरली.'
(1) झेंडू फुटणे (2) फन्ना उडवणे (3) दवंडी पिटणे (4) धीर देणे

**प्रश्न क्र. 23 ते 25 साठी सूचना : –**
**खालील संवाद वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांतून निवडा :**

"चानी, तुझे चित्र दाखव ना!"
"हे बघ विनय."
"वा! रस्ता स्वच्छ करणाऱ्या व्यक्तीचे खूप सुंदर चित्र काढलेस तू चानी."
"तुझे चित्र पण छान आहे की विनय!"
"पुरे झालं माझं कौतुक संचित. चला आता हॉलमध्ये जाऊ."
"अरे मुलांनो, कुठे निघालात आत्ता?"
"सर, स्वातंत्र्यादिनाच्या पूर्वसंध्येला चित्रांचे प्रदर्शन भरणार आहे ना!"
"हो कल्पित; पण त्याला अजून वेळ आहे."
"पण सर, मग चित्रं कधी मांडू आम्ही?"
"आज हॉलची स्वच्छता होईल अनिल. मग उद्या चित्रं मांडू."
"आम्ही करु का सर स्वच्छता?"
"हं! या अस्मिताला तर भारी आवड आहे स्वच्छतेची!"
"अनिल, तिला चिडवू नकोस. स्वच्छतादिनासाठी तू सुद्धा स्वच्छतादूत म्हणून काम करणार आहेस."
"खरंच की सर, आणि पर्यावरण दिनाला बागेची पण स्वच्छता केली होती मी."
"चला आता सगळे. तासाभरात उन्हं डोक्यावर येतील."
"हो सर." असे म्हणत सगळेजण वर्गातून बाहेर पडून हॉलच्या दिशेने निघाले.

**23.** वरील संवादात एकूण किती व्यक्तींनी भाग घेतला असावा?
(1) वर्गातील सर्व जण (2) सात
(3) चित्रकला स्पर्धेतील सर्व विद्यार्थी (4) आठ

<u>कच्च्या कामासाठी फक्त</u>

**24.** चित्रांचे प्रदर्शन कोणत्या तारखेला भरणार आहे?

(1) 15 ऑगस्ट (2) 2 ऑक्टोबर

(3) 5 जून (4) 14 ऑगस्ट

**25.** वरील संवादाशी जुळणारे विधान पर्यायांतून निवडा :

(1) एक व्यक्ती रस्ता स्वच्छ करत होती.

(2) संवाद घडला ती वेळ सकाळी अकरा वाजताची होती.

(3) अस्मिताने हॉलची स्वच्छता केली.

(4) शाळेत चित्रकला स्पर्धा भरणार होती.

**कच्च्या कामासाठी फक्त**

**SECTION - II**

## MATHEMATICS

**Instruction for Question No. 26 and 27**

Answer the following questions on the basis of pictographical information given below.

Scale 1 ☺ = 5 students.

| Favourite Subject | Number of Students |
|---|---|
| Marathi | ☺ ☺ ☺ ☺ ☺ ☺ ☺ |
| Hindi | ☺ ☺ |
| English | ☺ ☺ ☺ ☺ |
| Mathematics | ☺ ☺ ☺ ☺ |
| General Science | ☺ ☺ ☺ ☺ ☺ ☺ |
| Social Studies | ☺ ☺ |

pictograph indicates the number of students and the subject they like.

**26.** The number of students who like Marathi, Hindi and English is more by how much than the number of students who like Mathematics, General science & Social studies?

(1) 1 (2) 5

(3) 13 (4) 65

**27.** What is the percentage of the students who like General science?

(1) 30%

(2) 24%

(3) 6%

(4) 18%

**SPACE FOR ROUGH WORK**

## विभाग - II

### गणित

**प्रश्न क्र. 26 व 27 साठी सूचना –**

खालील चित्ररुप माहितीच्या आधारे प्रश्नांची उत्तरे लिहा.

प्रमाण - 1 ☺ = 5 विद्यार्थी.

| आवडणारे विषय | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| मराठी | ☺ ☺ ☺ ☺ ☺ ☺ ☺ |
| हिंदी | ☺ ☺ |
| इंग्रजी | ☺ ☺ ☺ ☺ |
| गणित | ☺ ☺ ☺ ☺ |
| सा. विज्ञान | ☺ ☺ ☺ ☺ ☺ ☺ |
| सा. शास्त्रे | ☺ ☺ |

**26.** मराठी, हिंदी व इंग्रजी विषय आवडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही गणित, सा. विज्ञान व सा. शास्त्रे हे विषय आवडणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीने जास्त आहे?

(1) 1 (2) 5

(3) 13 (4) 65

**27.** एकूण विद्यार्थ्यांपैकी सा. विज्ञान हा विषय शेकडा किती विद्यार्थ्यांना आवडतो?

(1) 30%

(2) 24%

(3) 6%

(4) 18%

**कच्च्या कामासाठी फक्त**

**28.** How many three digit numbers are divisible by 15?

(1) 66

(2) 65

(3) 6

(4) 60

**29.** For fitness of health Vidya does surya namaskar for one and half hour daily and Vijaya does Yoga for one and quarter hour daily. In the month of April how much more time did Vidya engage for fitness?

(1) 7 hours

(2) 7.25 hours

(3) 7.5 hours

(4) 7 hours 30 minutes

**30.** One mobile seller purchased a mobile at forty eight and quarter thousand. He sold the mobile at fifty two and half thousand. How much profit did he earn?

(1) Four and quarter thousand rupees.

(2) Quarter to four thousand rupees.

(3) Five and quarter thousand rupees.

(4) Four and half thousand rupees.

**31.** Use any 5 digits from 0 to 9 only once and form a biggest 5 digit number which is completely divisible by 6?

(1) 98760

(2) 98769

(3) 98768

(4) 98754

**SPACE FOR ROUGH WORK**

**28.** 15 ने विभाज्य असणाऱ्या तीन अंकी संख्या किती?

(1) 66

(2) 65

(3) 6

(4) 60

**29.** उत्तम आरोग्यासाठी विद्या दररोज दीड तास सूर्यनमस्कार घालते व विजया दररोज सव्वा तास योगासने करते, तर एप्रिल महिन्यात विद्याने विजयापेक्षा किती जास्त वेळ आरोग्यासाठी दिला?

(1) 7 तास

(2) 7.25 तास

(3) 7.5 तास

(4) 7.30 तास

**30.** एका भ्रमणध्वनी विक्रेत्याने सव्वा अठ्ठेचाळीस हजार रुपयांना खरेदी केलेला भ्रमणध्वनी ग्राहकास साडे बावन्न हजार रुपयांना विकला, तर भ्रमणध्वनी विक्रेत्यास किती रुपये नफा झाला?

(1) सव्वा चार हजार रुपये

(2) पावणेचार हजार रुपये

(3) सव्वा पाच हजार रुपये

(4) साडेचार हजार रुपये

**31.** 0 ते 9 मधील कोणतेही पाच अंक प्रत्येकी एकदा वापरून तयार होणारी पाच अंकी मोठ्यात मोठी अशी संख्या कोणती की जिला 6 ने निःशेष भाग जाईल?

(1) 98760

(2) 98769

(3) 98768

(4) 98754

**कच्च्या कामासाठी फक्त**

**32.** Vishwas has a bundle of 20 rupee notes with serial number from 27301 to 27385. If he gave his friend the note from serial number 27336 to 27345 from the bundle then how much amount is left with him?

(1) 1460 rupees

(2) 1520 rupees

(3) 1500 rupees

(4) 1480 rupees

**33.** Which of the following statement is incorrect?

(1) A line segment joining any two points on a circle is called a chord.

(2) A diameter is the longest chord of the circle.

(3) Infinite chords can be drawn in a circle.

(4) All the chords in a circle are equal in length.

**34.** Arrange the following in a ascending order, then what is the half of the addition of the first and middle number in that ascending order.

33628, 36328, 32368, 38632, 38326

(1) 34348

(2) 37480

(3) 68696

(4) 35500

**35.** $78 - 8 + 10 \div 5 \times 2 = ?$

(1) 32

(2) 74

(3) 71

(4) 144

**SPACE FOR ROUGH WORK**

**32.** विश्वासकडील एका 20 रुपयांच्या नोटांच्या बंडलमध्ये 27301 या क्रमांकापासून 27385 या क्रमांकापर्यंतच्या क्रमाने नोटा आहेत. या बंडलमधील 27336 या क्रमांकापासून 27345 या क्रमांकापर्यंतच्या नोटा त्याने मित्राला दिल्या, तर विश्वासकडील त्या नोटांच्या बंडलमधील किती रक्कम शिल्लक आहे?

(1) 1460 रुपये

(2) 1520 रुपये

(3) 1500 रुपये

(4) 1480 रुपये

**33.** खालीलपैकी अयोग्य विधान कोणते?

(1) परीघावरील कोणतेही दोन बिंदू जोडणारा रेषाखंड म्हणजे जीवा होय.

(2) वर्तुळाची सर्वात मोठी जीवा व्यास असते.

(3) एका वर्तुळात असंख्य जीवा काढता येतात.

(4) एका वर्तुळातील सर्व जीवा समान लांबीच्या असतात.

**34.** 33628, 36328, 32368, 38632, 38326 या संख्या चढत्या क्रमाने लावल्यास पहिल्या व मध्यभागी येणाऱ्या संख्यांच्या बेरजेची निमपट किती?

(1) 34348

(2) 37480

(3) 68696

(4) 35500

**35.** $78 - 8 + 10 \div 5 \times 2$ = किती?

(1) 32

(2) 74

(3) 71

(4) 144

**कच्च्या कामासाठी फक्त**

**36.** $\frac{3}{*} + \frac{4}{*} = 1$, In this equation $*$ represents the same digit, $* = ?$

(1) 3

(2) 7

(3) 4

(4) 12

**37.** Ayush runs 125 meter in one minute time then how many seconds he will require to run 500 meters?

(1) 4 seconds

(2) 120 seconds

(3) 180 seconds

(4) 240 seconds

**38.** In a village total number of male and female is 1400. If there are 560 males then the percentage of female is more or less than male by how much?

(1) less by 20%

(2) more by 10%

(3) less by 10%

(4) more by 20%

**39.** 1080 meter wire is required to fence three layers to the rectangular farm. If the length of the farm is twice its breadth then what is the breadth of the farm?

(1) 60 meter

(2) 120 meter

(3) 90 meter

(4) 180 meter

**SPACE FOR ROUGH WORK**

**36.** $\frac{3}{*} + \frac{4}{*} = 1$, या उदाहरणात * च्या जागी समान अंक आहे, तर* = किती?

(1) 3

(2) 7

(3) 4

(4) 12

**37.** आयुष एक मिनिटात 125 मीटर अंतर धावतो तर 500 मीटर अंतर धावण्यासाठी त्याला किती सेकंद वेळ लागेल?

(1) 4 सेकंद

(2) 120 सेकंद

(3) 180 सेकंद

(4) 240 सेकंद

**38.** एका गावात पुरुष व स्त्रियांची एकूण संख्या 1400 आहे. त्यात 560 पुरुष असतील तर स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येपेक्षा शेकडा कितीने जास्त अथवा कमी आहे?

(1) 20% ने कमी

(2) 10% ने जास्त

(3) 10% ने कमी

(4) 20% ने जास्त

**39.** एका आयताकृती शेताला तारेचे तीन पदरी कुंपण घालण्यासाठी 1080 मीटर तार लागली. शेताची लांबी रूंदीच्या दुप्पट असल्यास शेताची रूंदी किती?

(1) 60 मीटर

(2) 120 मीटर

(3) 90 मीटर

(4) 180 मीटर

**कच्च्या कामासाठी फक्त**

**40.** Use 1, 7, 5, 8 digit at least once and form a biggest five digit number?

(1) 87751 (2) 88751

(3) 87518 (4) 88571

**41.** 6 tens × 5 hundreds = ?

(1) 3 thousands (2) 300 hundreds

(3) 30 tens (4) 30 hundreds

**42.** If 3005 − ☐ = 1189.3 then ☐ = ?

(1) 4194.3 (2) 1815.3

(3) 1816.7 (4) 1815.7

**43.** 4 hours 35 minutes + 3 hours 25 minutes = ?

(1) 8 hours 10 minutes (2) 7 hours 50 minutes

(3) 8 hours (4) 7 hours

**44.** Which of the following is the correct ascending order of the given fractions.

$\frac{5}{9}, \frac{3}{7}, \frac{6}{13}, \frac{2}{3}$

(1) $\frac{2}{3}, \frac{3}{7}, \frac{5}{9}, \frac{6}{13}$

(2) $\frac{2}{3}, \frac{5}{9}, \frac{6}{13}, \frac{3}{7}$

(3) $\frac{3}{7}, \frac{6}{13}, \frac{5}{9}, \frac{2}{3}$

(4) $\frac{3}{7}, \frac{5}{9}, \frac{6}{13}, \frac{2}{3}$

**SPACE FOR ROUGH WORK**

**40.** 1, 7, 5, 8 हे अंक प्रत्येकी किमान एकदा वापरून तयार होणारी मोठ्यात मोठी पाच अंकी संख्या कोणती?

(1) 87751 (2) 88751

(3) 87518 (4) 88571

**41.** 6 दशक $\times$ 5 शतक = किती?

(1) 3 हजार (2) 300 शतक

(3) 30 दशक (4) 30 शतक

**42.** 3005 – ☐ = 1189.3 तर ☐ = किती?

(1) 4194.3 (2) 1815.3

(3) 1816.7 (4) 1815.7

**43.** 4 तास 35 मिनिटे + 3 तास 25 मिनिटे = किती?

(1) 8 तास 10 मिनिटे (2) 7 तास 50 मिनिटे

(3) 8 तास (4) 7 तास

**44.** $\frac{5}{9}, \frac{3}{7}, \frac{6}{13}, \frac{2}{3}$ या अपूर्णांकांचा योग्य चढता क्रम कोणता?

(1) $\frac{2}{3}, \frac{3}{7}, \frac{5}{9}, \frac{6}{13}$

(2) $\frac{2}{3}, \frac{5}{9}, \frac{6}{13}, \frac{3}{7}$

(3) $\frac{3}{7}, \frac{6}{13}, \frac{5}{9}, \frac{2}{3}$

(4) $\frac{3}{7}, \frac{5}{9}, \frac{6}{13}, \frac{2}{3}$

**कच्च्या कामासाठी फक्त**

**45.** A exam finished at 14 hours and 15 minutes. The duration of the exam is 3 hours then according to the 12 hour clock what time did the exam start?

(1) Post meridiem 11 hours 15 minutes.

(2) Ante meridiem 5 hours 15 minutes.

(3) Post meridiem 5 hours 15 minutes.

(4) Ante meridiem 11 hours 15 minutes.

**46.** What is the principal when the simple interest is 1540 rupees for 4 years at the rate 7 p.c.p.a.?

(1) 4500 rupees

(2) 5500 rupees

(3) 5000 rupees

(4) 8800 rupees

**47.** In the given figure, the number of obtuse angles is less than acute angles by how much?



(1) 14 (2) 13

(3) 12 (4) 10

**48.** The total expenses of the school trip is 98980 rupees. If 49 students participated in the trip then what is the per head contribution collected?

(1) 2020 rupees (2) 220 rupees

(3) 202 rupees (4) 2002 rupees

**SPACE FOR ROUGH WORK**

**45.** तीन तास चालणारी एक परीक्षा 14 वाजून 15 मिनिटांनी संपली तर 12 ताशी घड्याळानुसार परीक्षा किती वाजता सुरू झाली?

(1) मध्यान्होत्तर 11 वाजून 15 मिनिटे

(2) मध्यान्हपूर्व 5 वाजून 15 मिनिटे

(3) मध्यान्होत्तर 5 वाजून 15 मिनिटे

(4) मध्यान्हपूर्व 11 वाजून 15 मिनिटे

**46.** द.सा.द.शे. 7 दराने एका मुद्दलाचे 4 वर्षांचे सरळव्याज 1540 रुपये आहे, तर मुद्दल किती?

(1) 4500 रुपये

(2) 5500 रुपये

(3) 5000 रुपये

(4) 8800 रुपये

**47.** खालील आकृतीत तयार होणाऱ्या विशालकोनांची संख्या लघुकोनांच्या संख्येपेक्षा कितीने कमी आहे?



(1) 14 (2) 13

(3) 12 (4) 10

**48.** एका शालेय सहलीसाठी 98980 रुपये खर्च झाला. सहलीमध्ये 49 विदयार्थी सहभागी झाले असल्यास प्रत्येक विदयार्थ्याकडून किती वर्गणी घ्यावी लागेल?

(1) 2020 रुपये (2) 220 रुपये

(3) 202 रुपये (4) 2002 रुपये

**कच्च्या कामासाठी फक्त**

**49.** Saniya purchased 15 kg. rice at the rate of 48 rupees per kg., 5 kg. sugar at the rate of 42 rupees per kg. and 2 kg. groundnut at the rate of 170 per kg. If she pays three notes of 500 rupees to the shopkeeper then how much money will the shopkeeper pay back to Saniya?

(1) 230 rupees
(2) 270 rupees
(3) 730 rupees
(4) 1270 rupees

**50.** 35% of 240 = ?

(1) 168
(2) 42
(3) 84
(4) 72

**51.** If 35 is multiplied by 11 instead of 7 then the product is more by how much?

(1) 20
(2) 140
(3) 4
(4) 28

**52.** How many numbers with digit 5 from 1 to 100 are composite numbers?

(1) 19
(2) 17
(3) 15
(4) 16

**53.** How will you read the decimal number 45.25 correctly?

(1) Forty five point twenty five.
(2) Forty five integer twenty five fraction.
(3) Four thousand five hundred and twenty five.
(4) Forty five point two five.

**54.** The product of all the factors of 35 is more by how much than the addition of all the factors of 35?

(1) 1177
(2) 134
(3) 242
(4) 1273

**SPACE FOR ROUGH WORK**

**49.** सानियाने दुकानातून 48 रुपये प्रती किग्रॅ. दराने 15 किग्रॅ. तांदूळ, 42 रुपये प्रती किग्रॅ. दराने 5 किग्रॅ. साखर व 170 रुपये प्रती किग्रॅ. दराने 2 किग्रॅ. शेंगदाणे खरेदी केले. तिने दुकानदारास 500 रुपयांच्या तीन नोटा दिल्यास दुकानदार तिला किती रुपये परत करेल?

(1) 230 रूपये (2) 270 रूपये
(3) 730 रूपये (4) 1270 रूपये

**50.** 240 चे 35% = किती?

(1) 168 (2) 42
(3) 84 (4) 72

**51.** 35 ला 7 ने गुणण्याऐवजी 11 ने गुणल्यास गुणाकार कितीने जास्त येईल?

(1) 20 (2) 140
(3) 4 (4) 28

**52.** 1 ते 100 मध्ये 5 हा अंक असलेल्या संयुक्त संख्या किती?

(1) 19 (2) 17
(3) 15 (4) 16

**53.** 45.25 या दशांश अपूर्णांकाचे योग्य पद्धतीने वाचन कसे कराल?

(1) पंचेचाळीस दशांशचिन्ह पंचवीस
(2) पंचेचाळीस पूर्णांक पंचवीस दशांश
(3) चार हजार पाचशे पंचवीस
(4) पंचेचाळीस दशांशचिन्ह दोन पाच

**54.** 35 च्या सर्व विभाजकांचा गुणाकार हा 35 च्या सर्व विभाजकांच्या बेरजेपेक्षा कितीने जास्त आहे?

(1) 1177 (2) 134
(3) 242 (4) 1273

**कच्च्या कामासाठी फक्त**

**55.** The sweet box contained 17 kg. 250 gm. of sweets. If out of which 13 kg. 750 gm. of sweets was distributed to the students then how much sweets are left?

(1) 4 kg. 500 gm.

(2) 3 kg. 750 gm.

(3) 3 kg. 500 gm.

(4) 3 kg. 250 gm.

**56.** The length of one side of the triangle is 14 cm., remaining both the sides are of same length. If the perimeter of the triangle is 55 cm. then what is the length of each side of triangle that are equal in length?

(1) 15.5 cm.

(2) 21 cm.

(3) 20.5 cm.

(4) 41 cm.

**57.** In a garden there are total 2060 flower plants. There are 206 mogra plants, 515 lily plants, 618 marigold plants and remaining are rose plants. What is the percentage of rose plants in the garden?

(1) 30% (2) 35%

(3) 25% (4) 20%

**58.** In the number 96431, the place value of digit at tens place is how many times the place value of digit at thousands place?

(1) $\frac{1}{200}$

(2) 200

(3) $\frac{1}{2}$

(4) 2

**SPACE FOR ROUGH WORK**

**55.** एका मिठाईच्या खोक्यात 17 किग्रॅ. 250 ग्रॅम मिठाई होती. त्यातील 13 किग्रॅ. 750 ग्रॅम मिठाई विद्यार्थ्यांना वाटली, तर खोक्यात किती मिठाई शिल्लक राहिली?

(1) 4 किग्रॅ. 500 ग्रॅम

(2) 3 किग्रॅ. 750 ग्रॅम

(3) 3 किग्रॅ. 500 ग्रॅम

(4) 3 किग्रॅ. 250 ग्रॅम

**56.** त्रिकोणाच्या एका बाजूची लांबी 14 सेमी. असून उरलेल्या दोन्ही बाजू समान लांबीच्या आहेत. जर त्रिकोणाची परिमिती 55 सेमी. असल्यास समान लांबी असणाऱ्या बाजूंची प्रत्येकी लांबी किती?

(1) 15.5 सेमी.

(2) 21 सेमी.

(3) 20.5 सेमी.

(4) 41 सेमी.

**57.** एका बागेत एकूण 2060 फुलझाडे आहेत. त्यात 206 झाडे मोगऱ्याची, 515 झाडे जाईची, 618 झाडे सदाफुलीची व उरलेली झाडे गुलाबाची आहेत. तर त्या बागेत गुलाबाची शेकडा किती झाडे आहेत?

(1) 30% (2) 35%

(3) 25% (4) 20%

**58.** 96431 मधील दशक स्थानच्या अंकाची स्थानिक किंमत हजार स्थानच्या अंकाच्या स्थानिक किमतीच्या किती पट आहे?

(1) $\frac{1}{200}$

(2) 200

(3) $\frac{1}{2}$

(4) 2

| कच्च्या कामासाठी फक्त |
| --- |
| |

**59.** 36 pages are required to print one book. How much gross of paper will be needed to print 16 such books.

(1) 576 (2) 48

(3) 6 (4) 4

**60.** Amol sold a cycle at 7980 ₹ and got a loss of 1050 ₹ then what is the cost price of the cycle?

(1) 6930 ₹ (2) 9030 ₹

(3) 9050 ₹ (4) 8030 ₹

**61.** The perimeter of a rectangle and a square is equal. If the length of the rectangle is 18 cm. and breadth is 14 cm. then what is the area of the square?

(1) 256 sq. cm. (2) 64 sq. cm.

(3) 252 sq. cm. (4) 32 sq. cm.

**62.** In the given subtraction which digit will replace $\square$ and $\triangle$ respectively?

$$\begin{array}{r} 4\ 3\ \square\ 1\ 7 \\ -\ 1\ 3\ 2\ 2\ 9 \\ \hline 2\ 9\ 7\ 8\ \triangle \end{array}$$

(1) 8,0 (2) 9,8

(3) 0,8 (4) 5,6

**63.** In a secondary school there are 924 students. $\frac{2}{7}^{th}$ part of students travel by bus, $\frac{3}{11}^{th}$ part of students travel by cycle and the remaining come walking to school. Therefore how many students walk to school?

(1) 264 (2) 252

(3) 516 (4) 408

**SPACE FOR ROUGH WORK**

**59.** एक पुस्तक छापण्यासाठी 36 पाने लागतात, तर अशी 16 पुस्तके छापण्यासाठी किती ग्रोस कागद लागतील?

(1) 576 (2) 48

(3) 6 (4) 4

**60.** अमोलने एक सायकल 7980 रुपयांस विकल्याने त्याला 1050 रुपये तोटा झाला, तर सायकलची खरेदी किंमत किती?

(1) 6930 रुपये (2) 9030 रुपये

(3) 9050 रुपये (4) 8030 रुपये

**61.** एका आयताची व चौरसाची परिमिती समान आहे. जर आयताची लांबी 18 सेमी. व रूंदी 14 सेमी. असल्यास चौरसाचे क्षेत्रफळ किती?

(1) 256 चौ.सेमी. (2) 64 चौ.सेमी.

(3) 252 चौ.सेमी. (4) 32 चौ.सेमी.

**62.** खालील वजाबाकीत □ व △ च्या जागी अनुक्रमे कोणते अंक येतील?

$$\begin{array}{r} 4\,3\,\square\,1\,7 \\ -\ 1\,3\,2\,2\,9 \\ \hline 2\,9\,7\,8\,\triangle \end{array}$$

(1) 8,0 (2) 9,8

(3) 0,8 (4) 5,6

**63.** एका माध्यमिक विद्यालयात एकूण 924 विद्यार्थी आहेत. त्यातील $\frac{2}{7}$ विद्यार्थी बसने, $\frac{3}{11}$ विद्यार्थी सायकलने व उरलेले विद्यार्थी पायी येतात तर किती विद्यार्थी विद्यालयात पायी येतात?

(1) 264 (2) 252

(3) 516 (4) 408

<u>**कच्च्या कामासाठी फक्त**</u>

**64.** In the given cuboid which face is not adjacent to QKLR ?




(1) PJMS (2) SMLR

(3) JKLM (4) PJKQ

**65.** How many years are required to get the simple interest of 1944 ₹ on the principal amount of 10,800 ₹ at the rate of 6 p.c.p.a.?

(1) 6 years (2) 3 years

(3) 8 years (4) 4 years

**66.** Kissanrao purchased one litre of milk everyday from 15 February 2020 to 14 April 2020. If the total bill of milk is 3540 ₹ then what is the cost of one litre milk?

(1) 61 ₹ (2) 60 ₹

(3) 59 ₹ (4) 49 ₹

**67.** Which fraction is subtracted from $\frac{7}{11}$ to get the answer as $\frac{3}{7}$ ?

(1) $\frac{4}{77}$ (2) $\frac{3}{4}$

(3) $\frac{16}{77}$ (4) $\frac{21}{77}$

**SPACE FOR ROUGH WORK**

**64.** आकृतीमधील इष्टिकाचितीच्या QKLR या पृष्ठाच्या लगत नसणाऱ्या पृष्ठाचे नाव काय?




(1) PJMS (2) SMLR

(3) JKLM (4) PJKQ

**65.** 10,800 रुपयांचे द.सा.द.शे. 6 दराने 1944 रुपये सरळव्याज होण्यासाठी किती वर्षे लागतील?

(1) 6 वर्षे (2) 3 वर्षे

(3) 8 वर्षे (4) 4 वर्षे

**66.** किसनरावांनी 15 फेब्रुवारी 2020 पासून 14 एप्रिल 2020 पर्यंत दररोज एक लीटर दूध घेतले. या कालावधीतील दुधाच्या बिलाची रक्कम 3540 रुपये असेल, तर दुधाचा दर प्रती लीटर किती रुपये होता?

(1) 61 रुपये (2) 60 रुपये

(3) 59 रुपये (4) 49 रुपये

**67.** $\frac{7}{11}$ मधून किती वजा केले म्हणजे वजाबाकी $\frac{3}{7}$ येईल?

(1) $\frac{4}{77}$ (2) $\frac{3}{4}$

(3) $\frac{16}{77}$ (4) $\frac{21}{77}$

**कच्च्या कामासाठी फक्त**

**68.** Twenty three thousand seven hundred and fifty + Eight hundred and twenty five + Eight thousand and five hundred = ?

(1) 33075 (2) 34075

(3) 25425 (4) 24575

**69.** What is the difference between the addition of 2 digit prime numbers with digit 3 in one's place and the addition of 2 digit prime numbers with digit 3 in ten's place ?

(1) 137 (2) 257

(3) 249 (4) 220

**70.** What is the total number of factors of 120?

(1) 16 (2) 18

(3) 15 (4) 14

**71.** In the given figure select the fraction equivalent to the fraction indicated by the shaded portion.



(1) $\frac{21}{25} \times \frac{5}{6}$ (2) $\frac{27}{45} - \frac{2}{15}$

(3) $\frac{9}{30} + \frac{7}{30}$ (4) $\frac{12}{15} - \frac{4}{15}$

**72.** 395.6 Decimeter = ________ hectometer.

(1) 39.56 (2) 0.03956

(3) 3.956 (4) 0.3956

**SPACE FOR ROUGH WORK**

68. पावणे चोवीस हजार + सव्वा आठशे + साडे आठ हजार = किती?

(1) 33075 (2) 34075

(3) 25425 (4) 24575

69. एककस्थानी 3 असलेल्या दोन अंकी मूळ संख्यांची बेरीज व दशकस्थानी 3 असलेल्या दोन अंकी मूळ संख्यांची बेरीज यातील फरक किती?

(1) 137 (2) 257

(3) 249 (4) 220

70. 120 या संख्येच्या सर्व विभाजकांची संख्या किती?

(1) 16 (2) 18

(3) 15 (4) 14

71. खालील आकृतीत रेखांकित भाग दर्शविणाऱ्या अपूर्णांकाचा सममूल्य अपूर्णांक कोणता?



(1) $\frac{21}{25} \times \frac{5}{6}$ (2) $\frac{27}{45} - \frac{2}{15}$

(3) $\frac{9}{30} + \frac{7}{30}$ (4) $\frac{12}{15} - \frac{4}{15}$

72. 395.6 डेसिमीटर = _________ हेक्टोमीटर.

(1) 39.56 (2) 0.03956

(3) 3.956 (4) 0.3956

कच्च्या कामासाठी फक्त

**73.** John purchased 5 chairs at 7750 ₹, he spend 500 ₹ on transport. He sold the chairs at rate of 1600 ₹ per chair then in this trade how much profit or loss did he make?

(1) 500 ₹ Loss

(2) 750 ₹ Profit

(3) 250 ₹ Loss

(4) 250 ₹ Profit

**74.** The area of the rectangular land is 1050 sq. m. If the breadth of that land is 30 m. then what is its length?

(1) 35 meter

(2) 45 meter

(3) 32 meter

(4) 37 meter

**75.** How will you write 49 in Roman numerals?

(1) XXXXIX

(2) LIX

(3) XLIX

(4) XLI

**SPACE FOR ROUGH WORK**

**73.** जॉनने 5 खुर्च्या 7750 रुपयांना खरेदी केल्या, वाहतुकीसाठी त्याला 500 रुपये खर्च आला. त्या खुर्च्या त्याने 1600 रुपयांस एक याप्रमाणे विकल्या, तर त्याला या व्यवहारात किती रुपये नफा अथवा तोटा झाला?

(1) 500 रुपये तोटा

(2) 750 रुपये नफा

(3) 250 रुपये तोटा

(4) 250 रुपये नफा

**74.** एका आयताकृती भूखंडाचे क्षेत्रफळ 1050 चौ.मी. आहे. भूखंडाची रूंदी 30 मीटर असल्यास भूखंडाची लांबी किती?

(1) 35 मीटर (2) 45 मीटर

(3) 32 मीटर (4) 37 मीटर

**75.** रोमन संख्याचिन्हात 49 ही संख्या कशी लिहितात?

(1) XXXXIX (2) LIX

(3) XLIX (4) XLI

**कच्च्या कामासाठी फक्त**

**कच्च्या कामासाठी फक्त**